वर्ष : ०५ | अंक: ५१ | मुंबई, मंगळवार १२ नोव्हेंबर २०१९ ते सोमवार १८ नोव्हेंबर २०१९ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 अवघ्या २०६ गृहसंस्थांना मालमत्ता करात सवलत

3 → 'नव्या राष्ट्रा'साठी स्वागतार्ह निवाडा

'भुयारी गटार'च्या कामाला मार्चपर्यंत 'अल्टिमेटम' ← 4

## आघाडीने वेळेत शिवसेनेला पाठिंबा न दिल्याने
# सत्ता स्थापनेचा पेच कायम

**राज्यात सत्तास्थापनेचा पेच कायम आहे. कारण शिवसेनेने सत्ता स्थापनेचा दावा केला असला तरीही पाठिंब्याचं पत्र काँग्रेस आणि राष्ट्रवादीने दिलं नाही त्यामुळे राज्यपालांनी यासाठीची वेळ वाढवून दिली नाही. त्यामुळे दावा जरी कायम असला तरीही शिवसेनेला दिलेली मुदत संपली आहे. शिवसेना दिलेल्या वेळेपर्यंत बहुमत सिद्ध करु शकलेली नाही. त्यामुळे राज्यात सत्तास्थापनेचा पेच कायम आहे. राज्यपालांकडे शिवसेनेने सत्ता स्थापनेचा दावा केला होता. मात्र तसं काहीही घडू शकलेलं नाही. आता काँग्रेस आणि राष्ट्रवादीला राज्यपाल सत्तास्थापनेसाठी बोलवू शकतात.**



शिवसेनेने केलेला सत्तास्थापनेचा दावा कायम आहे. मात्र शिवसेनेला दिलेली मुदत संपली आहे आणि ती मुदत वाढवून देण्यासाठी राज्यपालांनी नकार दिला आहे. त्यामुळे शिवसेनेची अभूतपूर्व कोंडी झाली आहे. आता राज्यपाल काय करणार? राष्ट्रपती राजवट लागू करणार की आघाडीला सत्ता स्थापनेसाठी पाचारण करणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

राज्यपालांनी शिवसेनेचा दावा स्वीकारलेला असला तरीही तो स्वतंत्र दावा आहे. भाजपाला सत्तास्थापनेसाठी बोलवण्यात आलं होतं. मात्र आम्ही सत्ता स्थापन करु शकत नाही असं भाजपाने सांगितलं. त्यानंतर शिवसेनेला सत्तास्थापनेसाठी बोलवण्यात आलं. शिवसेनेला दिलेली मुदत संपली आहे. शिवसेनेने सरकार बनवण्याचा दावा कायम ठेवला असला तरीही तो अर्थहीन आहे असं घटनातज्ज्ञ सुभाष कश्यप यांनी स्पष्ट केलं आहे. एवढंच नाही तर तिसऱ्या पक्षाला बोलवायचं की राष्ट्रपती राजवट लागू करायची हा सर्वस्वी निर्णय राज्यपालांचा आहे असंही कश्यप यांनी स्पष्ट केलं आहे.

### महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट?

सत्तास्थापनेसाठी शिवसेनेला वेळ वाढवून देण्यास राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी नकार दिल्याने महाराष्ट्रातील सत्तास्थापनेचा पेच कायम असून राज्याची वाटचाल राष्ट्रपती राजवटीच्या दिशेने सुरू झाल्याचे सांगण्यात येत आहे.

दिवसभरातील वेगवान घडामोडींनंतर शिवसेना नेते आदित्य ठाकरे, शिवसेना विधिमंडळ गटनेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना नेत्यांच्या शिष्टमंडळाने राज्यपालांची भेट घेतली. शिवसेनेने राज्यपालांकडे आपल्या आमदारांचं सह्यांचं पत्र सादर केलं व सत्तेवर दावा सांगितला. काँग्रेस-राष्ट्रवादीच्या पाठिंब्यांच पत्र देण्यासाठी शिवसेनेने तीन दिवसांचा वेळ वाढवून मागितला.




# बीडजवळ ट्रक-बोलेरोच्या धडकेत
## सात ठार, तीन जखमी



**बीड -** बीडमध्ये सोमवारी सकाळी बोलेरो आणि ट्रकच्या भीषण अपघातामध्ये सात जणांचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी आहेत. मृतांमध्ये दोन महिलांसह एका बालकाचा समावेश आहे. पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथे ही दुर्दैवी घटना घडली. जखमींना जवळी रूग्णालयात उपचारासाठी दाखळ करण्यात आलं आहे.

या भीषण अपघातातील मृत्यू पावलेले सर्वजण निवडुंगवाडीचे रहिवाशी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. रविवारी सकाळी बोलेरो गाडीला ट्रकने जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला.

# सुप्रीम कोर्टचा सुप्रीम निर्णय




**अयोध्येतील वादग्रस्त जागा राम मंदिर बांधण्यासाठी, तसेच अयोध्येतच पाच एकर जमीन मशिदीसाठी देण्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने शनिवारी दिला. या ऐतिहासिक निकालामुळे शंभर वर्षांहून अधिक जुना वाद संपुष्टात आला. या मुद्द्यावरून दोन समाजांमध्ये आलेली कटुता, विशेषतः गेल्या ३० वर्षांमध्ये झालेली प्रचंड राजकीय उलथापालथ, धार्मिक ध्रुवीकरणातून झालेली जीवितहानी अशी पार्श्वभूमी असल्यामुळे देशभर या निकालाविषयी उत्सुकतामिश्रित धास्ती होती. सर्वोच्च न्यायालयाने या खटल्याचे आणि निकालाचे स्वरूप वादग्रस्त जागेच्या मालकी हक्कांपुरते मर्यादित ठेवून तिच्या राजकीयीकरणास लगाम घातला. त्यामुळेच या संतुलित निकालावर देशभर सावध आणि संयत प्रतिक्रिया उमटल्या.**

सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या अध्यक्षतेखाली न्या. शरद बोबडे, न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. अशोक भूषण आणि न्या. एस. अब्दुल नझीर यांच्या खंडपीठाने हा निकाल एकमताने दिला. अयोध्येतील वादग्रस्त २.७७ एकर जागेची मालकी 'रामलल्ला विराजमान' यांना देण्यात येत असून या जागेचा ताबा केंद्र सरकारकडे राहील, असे निकालात नमूद करण्यात आले आहे. या निकालामुळे राम मंदिर उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विश्वस्त न्यास (ट्रस्ट) स्थापन करून मंदिर उभारणीची योजना तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने सरकारला तीन महिन्यांची मुदत दिली आहे.

वादग्रस्त २.७७ जागा निर्मोही आखाडा, राम लल्ला विराजमान आणि सुन्नी वक्फ मंडळाला समान

उर्वरित पृष्ठ 2 वर

# ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा आश्रय ट्रस्टच्या वतीने साईवाडी अंधेरी येथे संपन्न







आश्रय ट्रस्ट सलंग्न सिनिअर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशन संस्थापक श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १० नोव्हेंबर २०१९ रोजी अंधेरी साईवाडी या परिसरात सिनिअर सिटिझन सोशल राईट्स च्या वतीने ३६ जेष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरा करण्यात आला अंधेरी कमिटीच्या अध्यक्ष श्रीमती तुकाबाई चौधर यांच्या तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत आले. यावेळी साईवाडीतील पंढरीनाथ खंडागळे (निवृत्त पो.अधिकारी) उपस्थित होते तसेच वासुदेव पाष्टे, हरिश्चंद्र रेवाळे , किसन शेवाळे,राजाराम चव्हाण ,दिलीप प्रभु ,काशिराम मांडवकर , शशिकांत बंड ,हरिश राठोड , महादेव पारदळे , दिपक महाडिक तसेच खास करुन संतोष चौधर यांनी अथक परिश्रम घेतले.

# इलेक्शन किंग माजी निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांचं निधन



**चेन्नई:** देशात खऱ्या अर्थाने निकोप निवडणुकांचे पर्व सुरू करून देशातील निवडणूक प्रणालीचा चेहरामोहरा बदलणारे इलेक्शन किंग, माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांचं आज हृदयविकाराच्या झटक्याने चेन्नईत निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते.

टी.एन. शेषन यांना स्मृतिभ्रंशाचा त्रास होता. त्यामुळे त्यांच्या घरच्यांनी त्यांना घरापासून ५० किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या वृद्धाश्रमात ठेवले आहे. तीन वर्ष वृद्धाश्रमात घालविल्यानंतर ते घरी आले. मात्र घरात करमत नसल्याने ते संपूर्ण दिवस वृद्धाश्रमातच घालवत. गेल्या काही दिवसांपासून आजारी असलेल्या शेषन यांनी राहत्या घरी अंतिम श्वास घेतला. त्यांच्या निधनाने प्रामाणिक आणि कर्तव्य दक्ष प्रशासक गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.

निवडणूक प्रणालीत पारदर्शकता आणण्याचं आणि निवडणूक प्रक्रिया बदलण्याचं सर्व श्रेय शेषन यांनाच जातं. तीन-चार टप्प्यात मतदान घेण्याचं श्रेयही त्यांनाच जातं. मतदारांसाठी ओळखपत्र तयार करण्याची कल्पनाही त्यांनीच मांडली होती. शेषन हे १९९० मध्ये निवडणूक आयुक्त बनले होते. १९९० ते १९९६ पर्यंत त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून कारभार सांभाळला होता.

# वरळी-शिवडी उन्नत मार्गाचे काम रखडले

**मुंबई-** मुंबईतील पूर्व-पश्चिम वाहतूक कोंडी कमी करून वेगवान प्रवासासाठी आवश्यक असलेल्या वरळी ते शिवडी या उन्नत मार्गास २१ महिन्यांपूर्वी



मंजुरी मिळूनदेखील अजून कामास सुरुवात झालेली नसल्याचे माहिती अधिकारात निष्पन्न झाले आहे.

वरळी ते शिवडी या ४.५१ किमी लांबीच्या उन्नत मार्गाला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बैठकीत २७ फेब्रुवारी २०१८ ला मंजुरी देण्यात आली. त्यानुसार या प्रकल्पाचा खर्च १२७८ कोटी इतका आहे. सद्य:स्थितीत कंत्राटदार आणि सल्लागार नियुक्तीची निविदा प्रक्रिया प्रगतिपथावर असल्याची माहिती एमएमआरडीएने माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांना दिली आहे.

शिवडी रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडून उन्नत मार्गास सुरुवात होणार असून आचार्य दोंदे मार्ग, जगन्नाथ भातणकर मार्ग, ड्रेनेज चॅनेल रोड या मार्गावरून जात नारायण हर्डीकर मार्ग (प्रभादेवीजवळ) येथे समाप्त होईल. चार मार्गिका असणारा हा उन्नत मार्ग ४.५१ किमीचा आहे. शिवडी रेल्वे स्थानक, मुंबई पोर्ट ट्रस्ट मार्ग आणि प्रभादेवी रेल्वे स्थानक येथे रेल्वे मार्गावरून जाणारा आरओबी प्रस्तावित आहे.

# मुंबई पालिकेच्या निर्णयाला महत्त्व नाही का? -उच्च न्यायालय

**मुंबई-** मुंबई महानगरपालिकेने काळ्या यादीत टाकलेल्या कंत्राटदाराला नवी मुंबईतील खारघर ते बेलापूर या ९.५ किमीच्या सागरी किनारा मार्गाचे (कोस्टल रोड) काम देण्याच्या सिडकोच्या निर्णयाला उच्च न्यायालयाने बुधवारी स्थगिती दिली नाही. मात्र देशातील सगळ्यात श्रीमंत अशा मुंबई महानगरपालिकेने निकृष्ट दर्जाच्या कामावरून कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याच्या निर्णयाला काही महत्त्व नाही का? अशा कंत्राटदाराला कंत्राट देण्यात काय सार्वजनिक हित आहे? असा सवाल न्यायालयाने सिडकोला केला.

मुंबई पालिकेने काळ्या यादीत टाकलेल्या कंत्राटदाराला काम दिल्याबाबत आक्षेप घेत ललित अग्रवाल यांनी याप्रकरणी जनहित याचिका केली आहे. या प्रकरणी बुधवारी सुनावणी झाली. ज्या कंपनीला मुंबई पालिकेने काळ्या यादीत टाकत सात वर्षांची बंदी घातली आहे. कामातील अनियमिततेमुळे कंपनीविरोधात मुंबई पालिकेने गुन्हाही दाखल केला आहे. अशा कंपनीला सागरी किनारा मार्गाचे काम दिल्याचे याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. न्यायालयाने सिडकोकडे याबाबत विचारणा केली. तेव्हा



मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त यंत्रणा आहे. ती सरकारी नाही. त्यामुळे तिचे नियम देशातील कुठल्याही सरकारी यंत्रणांना लागू नाही. त्यामुळे जे कुमार इन्फ्राच्या नियुक्तीला या नियमानुसार आक्षेप घेण्याचा प्रश्नच नाही, असा दावा सिडकोतर्फे अ‍ॅड्. नितीन गांगल यांनी केला.

देशातील सगळ्यात श्रीमंत पालिकेने एखाद्या कंत्राटदाराला निकृष्ट दर्जाच्या कामासाठी काळ्या यादीत टाकले असेल तर अशा पालिकेच्या निर्णयाला सिडकोच्या लेखी काहीच महत्त्व नाही का? असा सवाल न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या खंडपीठाने केला. त्यावर आम्हीच नाही, तर देशातील अन्य १६ सरकारी संस्थांनीही या कंत्राटदाराला विविध विकासकामांचे कंत्राट दिले आहे, असेही सिडकोतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. एवढेच नव्हे, तर काळ्या यादीत टाकल्यानंतर तीन वर्षे उलटली असून आता या कंपनीला आक्षेप घेण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचा दावाही केला. न्यायालयाने मात्र सिडकोच्या या निर्णयाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

# मच्छीमारांना २५ हजारांची नुकसानभरपाई द्या!

**मुंबई-** पावसाळ्यातील मासेमारीच्या काळात चक्रीवादळे, अतिवृष्टी आल्याने मच्छीमारांचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकऱ्यांप्रमाणेच २५ हजारांची मदत आणि नौका मालकांना एक लाख रुपयांचे अनुदान द्यावे, अशी मागणी 'अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती'ने केली आहे. पावसाळ्यात १ जून ते ३१ जुलैपर्यंत



मासेमारीस बंदी असते. तर अनेक पारंपरिक मच्छीमार १५ ऑगस्टपर्यंत मासेमारीस समुद्रात जात नाहीत. यावर्षी पावसाळा उशिरा सुरू झाला आणि त्यानंतर अनेक वेळा अरबी समुद्रात कमी दाबाचे पट्टे, चक्रीवादळे आणि अतिवृष्टीमुळे मासेमारी करण्यास समुद्रात न जाण्याचे इशारे देण्यात आले. मासेमारीस जाताना बर्फ, डिझेल, शिधा आणि इतर साहित्य घेऊन गेलेल्या मच्छीमारांना अनेकदा किनाऱ्यावरूनच परत फिरावे लागले. तर वादळामध्ये अडकलेल्या नौकांचे आणि सामग्रीचे बरेच नुकसान झाले. चक्रीवादळाचा फटका किनाऱ्यांनादेखील बसल्यामुळे सुकवत ठेवलेल्या मासेदेखील नुकसान झाले. या सर्व नुकसानीचा योग्य तो विचार करून पंचनामे व्हावेत, अशी मागणी अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीचे अध्यक्ष दामोदर तांडेल यांनी केली आहे. मच्छीमारांच्या मागण्यांसदर्भात तांडेल यांनी मंगळवारी राज्याचे मत्स्य व्यवसाय आयुक्त राजीव जाधव यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.

# 'वॉटर टॉवर' वाहन लवकरच ताफ्यात

**मुंबई-** आग विझवण्यासाठी मिनी रोबो वाहन घेतल्यानंतर पालिकेने आता ५५ मीटर उंचीचे वॉटर टॉवर वाहन खरेदी करण्याचे ठरवले आहे. या टॉवर वाहनामुळे दाटीवाटीच्या झोपडपट्टीमध्ये किंवा उंच इमारतींवर उंचीवरून पाण्याचा मारा करता येणार असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. या वाहनासाठी पालिका तब्बल १३ कोटी खर्च करणार असून याबाबतचा प्रस्ताव येत्या स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे.

पालिकेची मुंबईत एकूण ३४ अग्निशमन केंद्रे असून २७० पेक्षा अधिक वाहनांचा ताफा दलाकडे आहे. गेल्या काही वर्षांत अग्निशमन दलात अनेक महागडी यंत्रसामुग्री दाखल झाली आहे. झोपडपट्ट्यांमध्ये किंवा दाटीवाटीच्या ठिकाणी मोठमोठी अवजड वाहने पोहोचू शकत नाही म्हणून अग्निशमन दलाने रोबोही खरेदी केला होता. मात्र हा रोबोही काही ठिकाणी जिन्यावरून वर



चढू न शकल्यामुळे नापास ठरला होता. अशातच आता अग्निशमन दलाने वॉटर टॉवर हे आणखी नवीन व महागडे वाहन खरेदी करण्याचे ठरवले आहे. अनेक ठिकाणी अग्निशमन दलाची वाहने पोहोचू शकत नाही. मुख्य रत्यावर उभे राहून आगीवर पाण्याचा फवारा मारून आग विझवावी लागते. अशा ठिकाणी हे ५५ मीटर उंचीचे वॉटर टॉवर उपयोगी पडेल असा प्रशासनाचा दावा आहे.

या वाहनावरील वॉटर मॉनिटरमुळे ५० मीटर लांबीपर्यंत समांतर पोहोच मिळत असल्यामुळे दाट लोकवस्ती परिसरात किंवा उंच इमारतीवर वरून पाण्याचा मारा करता येणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. या वाहनाची किंमत १२ कोटी २७ लाख ४ हजार रुपये असून त्याच्या खरेदीचा प्रस्ताव स्थायी समितीत मंजुरीसाठी येणार आहे.

# खड्ड्यांच्या तक्रारींचा नवा विक्रम

**मुंबई-** पालिकेच्या 'खड्डे दाखवा पाचशे रुपये मिळवा' या योजनेचा कालावधी संपलेला असला तरी या सात दिवसाच्या कालावधीत खड्ड्यांच्या तक्रारींनी नवा विक्रम रचला आहे. खड्ड्यांच्या तक्रारींसाठी पालिकेने सुरू केलेल्या ॲपवर गेल्या दीड महिन्यात जेवढ्या तक्रारी आल्या होत्या त्यापेक्षा जास्त तक्रारी गेल्या सात दिवसांत आल्या आहेत. पालिकेने खड्ड्यांच्या तक्रारी नोंदवण्यासाठी १९ सप्टेंबरला 'माय बीएमसीपॉटहोल फिक्सइट'हे मोबाइल ॲप सुरू केले. या ॲपवर गेल्या दीड महिन्यात १०७० तक्रारी आल्या होत्या. त्यातच पालिकेने मुंबईत १ नोव्हेंबरपासून 'खड्डे दाखवा आणि ५०० रुपयांचे बक्षीस मिळवा' अशी योजना आणली. या योजनेअंतर्गत ६ नोव्हेंबरपर्यंत एकूण १६७० तक्रारी आल्या. त्यापैकी ११५५ ठिकाणी जाऊन अधिकाऱ्यांनी तपासणी केली. तक्रारींपैकी ११४८ खड्डे बुजवले



असल्याचे आकड्यांवरून पुढे आले आहे. त्यामुळे आतापर्यंत या ॲपवर एकूण सुमारे साडेतीन हजार तक्रारी आल्या आहेत.

यापैकी ७६२ तक्रारी या अन्य प्राधिकरणांच्या रस्त्यांवर होत्या. त्यामुळे एकूण २७०० पेक्षा अधिक तक्रारी या ॲपच्या माध्यमातून सोडवण्यात आल्या. तर सुमारे अडीच हजार खड्डे बुजवण्यात आले. दरम्यान, पाचशे रुपये बक्षीसाची घोषणा प्रशासनाने के ल्यामुळे या योजनेची खूप चर्चा झाली व तक्रारदारांनी मोठ्या संख्येने तक्रारी केल्या. मात्र मोहीम संपून एक दिवस उलटला तरी पात्र तक्रारदारांना बक्षीस देण्याबाबत प्रशासनाने अद्याप काहीही घोषणा केलेली नाही. २४ तासांत खड्डा बुजवला नाही तर अधिकाऱ्यांच्या किंवा कंत्राटदाराच्या खिशातून पैसे दिले जातील, अशी घोषणा केली होती. ज्यांच्या तक्रारी २४ तासांनंतर बुजवल्या गेल्या त्यांना हे बक्षीस प्रशासनाला द्यावे लागणार आहे. मात्र हे बक्षीस कधी, कुठे, कसे देणार याबाबत काहीच माहिती प्रशासनाने दिलेली नाही. त्यामुळे तक्रारदारांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे.

# देशातील क्रूझ पर्यटनात चार वर्षांत दुप्पटीहून अधिक वाढ

**मुंबई- गेल्या काही वर्षांत पर्यटकांचा ओढा क्रूझ पर्यटनाकडे चांगलाच वाढला असून चार वर्षांत त्यामध्ये दुप्पटीहून अधिक वाढ झाली आहे. मुंबई पोर्ट ट्रस्ट येथे शुक्रवारी कोस्टा क्रूझ लाईन्सची क्रूझ दाखल झाल्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुंबई पोर्ट ट्रस्ट अध्यक्ष संजय भाटिया यांनी क्रूझ पर्यटनास चांगलीच चालना मिळत असल्याचे अधोरेखित केले.**



जलपर्यटनाला केंद्र सरकारच्या उपाययोजनांमुळे चालना मिळत असून क्रूझची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. गेल्या चार वर्षांत देशातील महत्त्वाच्या बंदरांवरील २०१५-१६ मधील एकूण क्रूझ फेऱ्यांची संख्या १२८ होती, ती २०१८-१९ मध्ये २८५ वर पोहचली. तर पर्यटकांची संख्या एक लाख २५ हजार ८३८ वरून दोन लाख ५७ हजार ६७० इतकी झाली आहे. देशाच्या किनारपट्टीवरील चेन्नई, कोचीन, मुंबई, नवीन मंगलोर आणि गोवा ही पाच महत्त्वाची बंदरे क्रूझ पर्यटनामध्ये सक्रिय आहेत. यामध्ये मुंबईचा क्रमांक सर्वात वरचा आहे. मुंबई बंदरावर २०१७-१८ या वर्षांत १०६ क्रूझच्या सफरी निघाल्या होत्या. येथून ८६ हजार ७५७ पर्यटकांनी क्रूझ पर्यटनाचा आनंद घेतला. त्याखालोखाल गोवा बंदराचा क्रमांक असून वर्षभरात तेथे ९९ क्रूझ दाखल झाल्या.

शुक्रवारी मुंबई पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष संजय भाटीया यांनी यासंदर्भात केलेल्या सादरीकरणात ही माहिती दिली. या प्रसंगी जलवाहतूक मंत्रालयाचे केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय म्हणाले भारतातील क्रूझ पर्यटनाची बाजारपेठ मोठ्या प्रमाणात वाढत असून देशाच्या आर्थिक विकासात क्रूझ पर्यटन मोलाची भूमिका बजावत आहे.' याप्रसंगी त्यांनी क्रूझ पर्यटनातील समस्या मांडून त्याचे निराकरण करण्याबाबत उपाययोजना केल्या जातील असे नमूद केले.

केंद्र सरकारकडून क्रूझ पर्यटनास चालना देण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जात आहेत. भविष्यात क्रूझ पर्यटनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने रोड मॅप तयार केला आहे. तसेच बंदरात येणाऱ्या क्रूझना थांबा घेण्यासाठी असलेल्या शुल्कामध्ये २० टक्के सूट देण्यात आली आहे. तसेच सात बंदरांवर पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात येणार आहे.

भविष्यात ब्रह्मपुत्रा आणि गंगा नद्यांचा विचारदेखील क्रूझ पर्यटनासाठी विचार होणार असल्याचे यावेळी भाटीया यांनी सादरीकरणात सांगितले. तारकर्ली, मुरुड, जंजिरा आणि गणपतीमुळे या ठिकाणांचा विकास करण्याचा प्रस्तावदेखील यामध्ये अंतर्भूत असून, मुंबईत नवीन टर्मिनलची उभारणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# अवघ्या २०६ गृहसंस्थांना मालमत्ता करात सवलत

**मुंबई-** कचरा वर्गीकरण करून सुक्या व ओल्या कचऱ्याची व सांडपाण्याची विल्हेवाट लावणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना मालमत्ता करात १५ टक्क्यांपर्यंत सवलत देण्याची योजना पालिकेने आणली असून त्यासाठीचे धोरणही तयार करण्यात आले आहे. ही सवलत याच आर्थिक वर्षांत लागू करण्याचा प्रशासनाचा विचार आहे. मात्र संपूर्ण मुंबईत केवळ २०६ संस्थांनाच सध्या तरी ही सवलत लागू होऊ शकते. केवळ याच सोसायट्यांमध्ये कचऱ्याचे वर्गीकरण केले जात असून त्यांना शून्य कचऱ्यासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न पालिकेतर्फे केला जाणार आहे.

कचरा वर्गीकरण करणाऱ्या सोसायट्यांना मालमत्ता करात सवलत देण्याचे पालिकेने जाहीर केले होते. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी घन कचरा व्यवस्थापन विभागाने धोरण तयार केले आहे. ओला व सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याची आपल्याच स्तरावर विल्हेवाट लावणाऱ्या सोसायट्यांना





व घरांनाही ही सवलत मिळू शकेल. पालिकेच्या कचराभूमीची क्षमता संपत चालल्यामुळे पालिकेने कचराभूमीवर जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. १०० किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणाऱ्या सोसायट्यांना आपल्याच आवारात ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची सक्ती करण्यात आली. घन कचरा व्यवस्थापन २०१६ लागू करण्यात आले. त्यामुळे आता प्रत्येक कुटुंबाला सुका व ओला कचऱ्याचे वर्गीकरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. याचाच पुढचा भाग म्हणून पालिकेने आता ओल्या व सुक्या कचऱ्याची विल्हेवाट आपल्याच स्तरावर लावणाऱ्या सोसायट्या व घरांना मालमत्ता करात सवलत देण्याचे ठरवले आहे. ही सवलत देण्यासाठी काय निकष असावेत याकरिता घनकचरा विभागाने धोरण ठरवले आहे. त्याअंतर्गत सध्या सर्व विभागांतून कोणत्या सोसायट्या आधीच कचरा वर्गीकरण व खत प्रकल्प राबवतात, त्यांची माहिती गोळा करण्याचे काम पालिकेने सुरू केले आहे.

# शाळांबाहेरील कोंडी फुटणार?

ठाणे पोलीस आणि शाळा प्रशासनाची लवकरच होणार बैठक; वाहने उभी करण्यासाठी आराखडा तयार करणार :- ठाणे शहरातील विद्यार्थ्यांना शाळेच्या परिसरात होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या त्रासाचा सामना करावा लागू नये यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेण्याचा निणऱ्य घेतला आहे. यासंदर्भात ठाणे वाहतूक पोलीस लवकरच शाळा प्रशासनासोबत एकत्रित बैठक घेऊन कोंडी सोडविण्याबाबत अंतिम तोडगा काढणार आहेत. त्यामध्ये शालेय बसचालकांनी आणि





पालकांनी कोणत्या भागात वाहने उभी करावी, याचा आराखडाही तयार केला जाणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

ठाणे शहरातील शाळांबाहेर सकाळी, दुपारी, संध्याकाळी विद्यार्थ्यांना नेणारी वाहने, शाळा बस, पालकांची वाहने यांची मोठी गर्दी होते. अनेक शाळांच्या परिसरातील रस्ते अरुंद असल्याने या वाहनांचा ताण तेथील नियमित वाहतुकीवर पडून वाहतूक कोंडी होते. या कोंडीचा परिणाम जोडरस्त्यांवरही दिसून येतो. तसेच या कोंडीचा त्रास विद्यार्थ्यांनाही होतो.

या पार्श्वभूमीवर ठाणे वाहतूक पोलिसांनी आता शाळेच्या परिसरातील कोंडी सोडविण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्याचा निणऱ्य घेतला आहे. या मोहिमेसाठी ठाणे वाहतूक पोलीस लवकरच शाळा प्रशासनासोबत एकत्रित बैठक घेणार आहे. त्यामध्ये शाळा प्रशासनासोबत चर्चा करून शालेय वाहने आणि पालकांची वाहने कुठे उभी करावीत, याचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. या आराखड्याचे काटेकोट पालन करण्यासाठी शाळेचे दोन कर्मचारी परिसरात तैनात केले जाणार असून ते आराखड्याप्रमाणेच वाहने उभी करण्याच्या सूचना बसचालकांसह पालकांना करणार आहेत. तसेच सूचना देऊनही शाळाच्या परिसरात वाहने उभी केली तर त्या वाहनमालकांवर कारवाई करण्याची योजनाही पोलिसांकडून आखली जात आहे, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

# राज्यात यापूर्वी दोनदा राष्ट्रपती राजवट

राज्यात कोणत्याही पक्षाला सरकार स्थापन करणे शक्य नसल्यास राष्ट्रपती राजवटीचा पर्याय शिल्लक राहतो. भाजप आणि शिवसेनेतील वादामुळे राज्याची वाटचाल राष्ट्रपती राजवटीकडे सुरू असल्याची कुजबूज सुरू झाली. आतापर्यंत राज्यात दोनदा राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती.

राज्यात सरकार स्थापन व्हावे या संदर्भात राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी अद्याप तरी पुढाकार घेतलेला नाही. १३व्या विधानसभेची मुदत येत्या शनिवारी संपुष्टात येईल. राज्यपालांनी सर्वाधिक जागा मिळालेल्या भाजपला पाचारण करून त्यांचे मत जाणून घ्यावे लागेल. भाजपने असमर्थता व्यक्त केल्यास दुसऱ्या क्रमांकावरील शिवसेनेला पाचारण करावे लागेल. कोणत्याच राजकीय पक्षाला १४५चा जादूई आकडा गाठणे शक्य नसल्यास शेवटचा पर्याय हा राष्ट्रपती राजवटीचा असेल. कोणत्याही राजकीय पक्षाकडे पुरेसे संख्याबळ नसल्यास राज्यपाल केंद्र सरकारला राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस करू शकतात. त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत राष्ट्रपती राजवटीचा निर्णय घेतला जातो.

राज्यात आतापर्यंत दोनदा राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. विशेष म्हणजे या दोन्ही वेळेला शरद पवार यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे संबंध होता. आणीबाणीनंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत इंदिरा गांधी यांचा पार धुव्वा उडाला होता. यानंतर जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले; पण अंतर्गत भांडणात जनता पक्षाचे सरकार कोसळले. १९८० मध्ये इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा सरकार सत्तेत आले. केंद्रात जनता पक्षाचे सरकार सत्तेत असताना शरद पवार यांनी 'पुलोद'चा प्रयोग केला व मुख्यमंत्रीपद मिळविले होते. केंद्रात इंदिरा गांधी परतल्यावर त्यांनी शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकार बरखास्त केले होते आणि राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. सुमारे तीन महिने राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होती. जून १९८० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळाले आणि बॅ. ए. आर. अंतुले यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले होते.

दुसऱ्यांदा २०१४ मध्ये राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाली होती. भाजप आणि शिवसेनेची युती तुटल्यावर राष्ट्रवादीनेही काँग्रेसबरोबर आघाडी तोडली होती. राष्ट्रवादीने आघाडी तोडल्यावर पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा पाठिंबा काढून घेत असल्याचे पत्र राज्यपालांना दिले होते. परिणामी चव्हाण सरकारने बहुमत गमावले होते. या साऱ्या घडामोडींनंतर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. राष्ट्रवादीने पाठिंबा काढून घेतल्याने राष्ट्रपती राजवट लागू झाली होती. २०१४ ची विधानसभा निवडणूक ही राष्ट्रपती राजवटीत पार पडली होती.

------(पृष्ठ १ वरुन)------

# सुप्रीम कोर्टचा सुप्रीम निर्णय

वाटून देण्याच्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या २०१० मधील निकालास आव्हान देणाऱ्या १४ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने हा निवाडा दिला. तो देताना सुन्नी वक्फ मंडळ आणि निर्मोही आखाड्याचा वादग्रस्त जागेवरील मालकीचा दावा घटनापीठाने अमान्य केला.

केंद्र सरकार किंवा उत्तर प्रदेश सरकारने सुन् नी वक्फ मंडळाला मशीद उभारण्यासाठी पाच एकर पर्यायी जागा द्यावी, असेही निकालात म्हटले आहे. बाबरी मशीद पाडण्याचे कृत्य चुकीचे होते, अशा चुका सुधारण्याची गरज आहे, अशी टिप्पणीही न्यायालयाने केली. ६ डिसेंबर १९९२ रोजी कारसेवकांनी बाबरी मशीद उद्ध्वस्त केली होती. वादग्रस्त जागा १६व्या शतकात मुघल सम्राट बाबर याने बळकावली होती, असा प्रवाद आहे.

सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनी ऑगस्टमध्ये दररोज सुनावणी घेऊन हा वाद निकाली काढण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार निवृत्तीआधी त्यांनी प्रदीर्घ काळ रेंगाळलेल्या या खटल्यावर ४० दिवस सुनावणी घेतली आणि शनिवारी निकाल दिला. न्या. गोगोई यांनी १०४५ पानी निकालपत्रातील महत्त्वाचा भाग वाचून दाखवला.

रामजन्मभूमी-बाबरी मशीद जागा वादाला राजकीय रंग देत भाजपने सत्ताही मिळवली होती. आता भाजप सरकारच्या काळातच या वादावर पडदा पडला आहे. शिलान्यासानंतर ३० वर्षांनी हा निकाल लागला आहे. राजीव गांधी सरकारच्या काळात ९ नोव्हेंबर १९८९ रोजी शिलान्यास करण्यात आला होता. या वादाबाबत न्यायालयाबाहेर तडजोडीचे प्रयत्न करण्यात आले होते, पण ते निष्फळ ठरले.

कारसेवकांनी ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद पाडल्यानंतर हिंदू-मुस्लीम दंगली झाल्या होत्या. १२ मार्च १९९३ रोजी मुंबईत घडवण्यात आलेल्या बॉम्बस्फोट मालिकेत शेकडो लोक मृत्युमुखी पडले होते.

काँग्रेसने या निकालाचे स्वागत केले असून राम मंदिर उभारणीस पाठिंबा दर्शवला आहे. विश्व हिंदू परिषदेचे माजी अध्यक्ष प्रवीण तोगडिया यांनी आजचा निकाल राम मंदिरासाठी बलिदान देणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना आदरांजली असल्याचे म्हटले आहे. वादग्रस्त जागेवर मालकीचा दावा केलेल्या निर्मोही आखाड्याने मात्र 'ना खेद ना खंत' अशी प्रतिक्रिया दिली.

## संपादकीय... शून्य गढ़ शहर..


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

पाणी मुबलक, म्हणून पंजाब-हरियाणातही भाताची लागवड. पाणी कमी, तरीही मराठवाड्यात वा सोलापूरसारख्या जिल्ह्यांत ऊस! धोरणशून्यता ही अशी सार्वत्रिक. प्रश्न केवळ धूर दिल्लीकडे जातो एवढ्यापुरता नाही, हे ओळखणार कोण?

भारतात प्रवेश करण्यासाठी सध्याचा काळ सर्वोत्तम असे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे बँकॉक येथे सांगत असताना भारताच्या राजधानीतील हवा अजिबात श्वसनयोग्य नसल्याचे जाहीर झाले. यातून आपल्याविषयीचा क्रूर योगायोग तेवढा सिद्ध होतो. एका बाजूला देश जागतिक स्तरावरील स्पर्धेत टिकावा यासाठी प्रयत्न केले जात असताना शुद्ध नको पण किमान श्वसनयोग्य हवा – तीदेखील राजधानीच्या शहरात – देता न येणे हे आपल्या गोंधळलेल्या विकास प्रारूपाचे फलित. आज दिल्लीतील जनतेस मुखवटा घालून जगण्याची वेळ आली ती त्यामुळेच. आधीच दिल्लीत खरा चेहरा कोणता आणि मुखवटा कोणता हे ओळखणे अवघड. त्यात ही अशी हवा. त्यामुळे दिल्लीचा खरा चेहरा कोणता हे ओळखणे अधिकच अवघड होणार. यंदा तर हवा इतकी खराब झाली की भरदुपारी वाहने दिवे लावून चालवण्याची वेळ दिल्लीकरांवर आली. अशक्त दृश्यमानतेमुळे विमानांची उड्डाणे रद्द करावी लागली आणि शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करावी लागली. गेल्या कित्येक वर्षांपासून हेच होत आले आहे. यातील अधिक गंभीर बाब म्हणजे हे का होते, यामागील कारण आपणास माहीत आहे. पण तरी ते टाळणे आपणास शक्य झालेले नाही. ते का, याचा विचार यानिमित्ताने केला जाणे गरजेचे आहे.



पंजाब, हरियाणा या राज्यांत शेतकरी आपली लागवडीखालील जमीन रापवण्यासाठी या काळात शेतात गवत पेटवतात. त्यामुळे पुढील हंगामासाठी शेत लवकर सज्ज होते. एकट्या संगरूर जिल्ह्यात साधारण एका महिन्यात या वेळी तब्बल २१५७ इतक्या ठिकाणी शेतांना आगी लावल्याने प्रसिद्ध झाले आहे. त्यावरून याचे प्रमाण किती मोठे आहे, याचा अंदाज यावा. दिल्लीस स्वत:चे असे काही नाही. हिमाचलात वा वर जम्मू-काश्मिरात बर्फवृष्टी झाली की राजधानी कुडकुडते आणि पंजाब, हरियाणातील शेतकऱ्यांनी शेतजमिनी पेटवल्या की दिल्लीकरांचा श्वास कोंडतो. यंदाही तसेच झाले आहे. वास्तविक या दोन राज्यांतील शेतकऱ्यांनी आपापल्या शेतजमिनी जाळू नयेत यासाठी जोरदार प्रचार झाला. काही ठिकाणी कारवाईचे इशारे दिले गेले. पण तरी या शेतकऱ्यांनी करावयाचे तेच केले आणि या दोन्ही राज्यांत आगीचे अनेक प्रकार घडले. यातील पंजाब हे काँग्रेसशासित आहे तर हरियाणात भाजपचे राज्य आहे. तरीही दोन्ही राज्यांत हे प्रकार घडले. त्यामुळे त्यास पक्षीय राजकारणाचा रंग देता येणार नाही. मग असे असेल तर या दोन राज्यांतील शेतकऱ्यांना आपापल्या जमिनी जाळण्याची गरज का वाटते?

या प्रश्नाचे उत्तर या राज्यांत गेल्या काही वर्षांपासून बदलल्या गेलेल्या पीक पद्धती आणि पीक यांत आहे. ऐतिहासिकदृष्ट्या ही दोन्ही राज्ये गव्हाच्या पिकासाठी ओळखली जातात. गव्हाचे कोठार असेच यामुळे या दोन्ही राज्यांना म्हटले जाते. काही दशकांपूर्वी राबवल्या गेलेल्या हरितक्रांती योजनेचा सर्वाधिक फायदा घेणारी राज्येदेखील हीच. मुबलक जलसंपदा आणि पाटबंधाऱ्यांचे उत्कृष्ट जाळे यामुळे या राज्यातील शेतकरी नेहमीच प्रयोगशील आणि यशस्वी राहिलेला आहे. या पार्श्वभूमीवर साधारण दहा वर्षांपूर्वी या राज्यांतील पीक पद्धतीत मोठा बदल केला गेला. त्यामागचा विचार शेतजमिनीचा अधिकाधिक उत्पादक वापर कसा केला जाईल हाच होता. त्यानुसार शेतकऱ्यांना भातपिकाची लागवड जूनच्या मध्यास करण्याचा आदेश या दोन्ही राज्यांत दिला गेला. त्याआधी ही लागवड एप्रिल-मे या काळात होत होती. हा बदल केला गेला कारण पावसाळ्यानंतर भूपृष्ठाखालील पाण्याचा जास्तीत जास्त विनियोग करता यावा यासाठी. या अनुषंगाने या दोन्ही राज्य सरकारांनी कायद्यात बदल केले आणि सरकारी आदेशाद्वारे शेतकऱ्यांना पीक पद्धतीत बदल करायला लावला. पण त्याचा परिणाम असा की भाताचे पीक लांबल्याने त्यानंतरच्या हंगामात गव्हाचे पीक घेण्यासाठी शेतकऱ्यांचा जमिनीची मशागत करण्यासाठीचा वेळ घटला. भाताचे पीक लांबणीवर आणि ते घेतल्यानंतर गव्हासाठी जमीन तयार करण्याची घाई. परत वेळ कमी. यावर मार्ग काय? तर जमीन जाळणे. एरवी जी जमीन नैसर्गिकरीत्या फेरलागवडीसाठी तयार झाली असती तिला सज्ज करण्यासाठी आता शेतकऱ्यांना जाळून रापवावे लागते.

# 'नव्या राष्ट्रा'साठी स्वागतार्ह निवाडा

**स्वातंत्र्यानंतरचा भारत हा 'जुना देश आणि नवे राष्ट्र'अशी प्रतिमा आहे. स्वातंत्र्यानंतरचा भारत भारतीय संविधानास अपेक्षित मूल्यांवर उभा करण्याची शपथ घेण्यात आली, परंतु धार्मिक समाज असणाऱ्या भारतात धर्मनिरपेक्ष समाज घडवण्यात किती आणि कशा प्रकारच्या समस्या निर्माण होतात याची प्रचीती आपल्याला पुन्हा पुन्हा येत असते. या प्रसंगात सर्वोच्च न्यायालयाला महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागते. ९ नोव्हेंबर, २०१९ रोजी न्या. रंजन गोगोई यांच्या नेतृत्वातील पाच सदस्यीय न्यायाधीशांच्या पीठाने दिलेला रामजन्मभूमी-बाबरी मशीद वादावरील निणऱ्य याचे उत्तम उदाहरण ठरले आहे. हा निणऱ्य संतुलित, समाधानकारक असल्यामुळे सर्व भारतीयांनी या निणऱ्याचे मनापासून स्वागत केले पाहिजे. एक ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक आणि धार्मिक आयाम असलेला हा बहुचर्चित, प्रलंबित आणि प्रतीक्षित विषयावरील निणऱ्य चाळीस दिवसांच्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.**



रामजन्मभूमी-बाबरी मशीद वाद हा इतका संवेदनशील झाला की सर्वोच्च न्यायालय निणऱ्य देणार आहे असे जाहीर होताच मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त, समाजमाध्यमांवर निर्बंध घालावे लागले. भारतीय समाज न्यायालयीन निवाडे समंजसपणे स्वीकारण्याइतका प्रगल्भ झाला नाही हे यावरून स्पष्ट होते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनचा हा वाद आहे. सुरुवातीला दोन पक्षकारांमधील या वादाने धार्मिक अस्मिता जाग्या केल्या, धर्मवादी राजकारण करणाऱ्यांना सत्ता संपादण्यासाठी हा विषय राजमार्ग वाटला आणि मग हा विषय त्याच पद्धतीने हाताळण्यात आला. परिणामी भारतातील गंगा-जमुनी संस्कृतीला त्याची किंमत मोजावी लागली. हा विषय कशा पद्धतीने वळणे घेत गेला, या प्रकरणातील ऐतिहासिक बाजू काय आहे हे समजून घेणे आवश्यक आहे.

मुगल बादशहा बाबर सत्तास्थानी असताना बाबराचा सहकारी मीर बाँकी याने १५२८-२९ मध्ये ही मशीद बांधली. तेव्हापासूनच या जमिनीची मालकी आणि वहिवाटीचा वाद चालू होता. मुगल आणि ब्रिटिश राजवटीत हा विषय अनिर्णीत राहिला. नंतर ब्रिटिशांनी याचा वापर हिंदू-मुस्लीम दरी वाढवण्यासाठी केला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर अयोध्याजवळच असणाऱ्या फैजाबाद येथील जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी या संदर्भात निणऱ्य दिला की, हिंदूंना तेथे रामाची पूजा करण्यासाठी परवानगी असावी. त्यासाठी मशिदीची भिंत कोरून तेथे रामलल्लाची मूर्ती बसवावी. ही मूर्ती निणऱ्यापूर्वीच गुपचूप बसवण्यात आली होती. त्यामुळे जिल्हाधिकारी नय्यर यांनी ती मूर्ती तशीच राहू द्यावी असा निणऱ्य दिला होता. तत्कालीन शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांनी यावर नाराजी व्यक्त करून पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंना पत्र लिहिले. पंडित नेहरूंनी धार्मिक तणाव वाढू नये आणि बेकायदा वर्तनाचे परिमार्जन करावे असे पत्र उत्तर प्रदेश सरकारला लिहिले; परिणामी त्या दरवाजाला कुलूप लावण्यात आले. १९८५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शहाबानो प्रकरणाचा निवाडा दिला. या निवाड्याविरोधात मुस्लीम जमातवाद्यांनी मोठे आंदोलन छेडले आणि तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधींनी न्यायालयाचा निवाडा फिरवून तलाकपीडित महिलांसाठी १९८६ मध्ये नवा कायदा आणला. या प्रकरणातून निर्माण झालेला हिंदुत्ववाद्यांचा राग शमवण्यासाठी राजीव गांधींनी दरवाजाला लावलेले कुलूप उघडले. संघ परिवाराने आणि नंतर भाजप आणि मित्र पक्षांनी राममंदिर उभारण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला. १९९० मध्ये रथयात्रा काढण्यात आली. १९९१ मध्ये लोकसभा आणि उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुका झाल्या. उत्तर प्रदेशात भाजपचे कल्याणसिंग सरकार सत्तेवर आले. पूजेच्या निमित्ताने जमलेल्या कारसेवकांनी ६ डिसेंबर, १९९२ मध्ये बाबरी मशिदीचा ढांचा उद्ध्वस्त केला. यानंतर मुंबईत साखळी बॉम्बस्फोट घडवून आणले गेले.. ज्यात अनेक निष्पापांना प्राण गमवावे लागले. याचे पडसाद राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटले होते.

अलाहबाद उच्च न्यायालयाने ३० सप्टेंबर २०१० मध्ये या विवादावर निवाडा दिला आणि जमिनीचे त्रिभाजन करण्यात आले. या वेळी न्यायालयाने राममंदिर – बाबरी मशीद हा आस्थेचा विषय न करता जमिनीवरील मालकी हक्काचा वाद म्हणून हाताळला होता.

रामजन्मभूमी-बाबरी मशीद वाद हा विषय अस्मितेचा ठरवून निवडणुका झाल्या. आत्ताच्या निवडणुकीतसुद्धा हा विषय डोकावत होताच. मागील रामनवमी उत्सवात एक राजकीय नेते म्हणाले.. 'आम्ही लॉर्डला मानणारे आहोत, माय लॉर्डला नाही.' सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा येण्यापूर्वीच राममंदिर उभारण्याची तयारी जोरात चालली होतीच. पंतप्रधान मोदींनी कायदा करून राममंदिर उभारावे अशीही मागणी करण्यात आली. तेव्हा पंतप्रधान मोदींनी योग्य भूमिका घेऊन स्पष्ट केले की, हा विषय न्यायालयीन निवाड्यानुसारच सोडवला जाईल. कायदा करणार नाही. या भूमिकेचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे. न्यायसंस्थेचा सन्मान केला पाहिजे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या निणऱ्यात निर्मोही आखाडा आणि शिया बोर्डची याचिका फेटाळून लावली. जमिनीच्या मालकीचा मुद्दा आस्थेपेक्षा महत्त्वाचा ठरवण्यात आला. ६ डिसेंबर १९९२ मध्ये पाडण्यात आलेली वादग्रस्त वास्तू बेकायदा असल्याचे नमूद केले, २०१० चा तीन भागांत विभाजनाचा निणऱ्य अयोग्य ठरवला. सुन्नी वक्फ बोर्डाला पुरावे देता आले नाहीत. हा निवाडा देताना आणखी दोन महत्त्वाच्या बाबी विचारात घेतल्या, त्या म्हणजे १८५६ पूर्वी हिंदू तेथे पूजा करीत होते आणि २००३ मध्ये पुरातत्त्व विभागाने दिलेला अहवाल ग्राह्य मानण्यात आला. या आणि इतर काही बाबी विचारात घेऊन निणऱ्यात सांगितले आहे, की वादग्रस्त जागेची मालकी रामलल्लाकडे देण्यात यावी. ट्रस्ट बनवून मंदिर बांधावे. या जागेच्या बदल्यात वादग्रस्त जागेपासून दूर पाच एकर जागा सुन्नी वक्फ बोर्डाला देण्यात यावी.

अत्यंत महत्त्वाच्या आणि जगाचे लक्ष असलेल्या या ऐतिहासिक निणऱ्याचे अनेकांनी स्वागत केले आहे, सुन्नी वक्फ बोर्डाने स्वागत केले. याचे आपण स्वागत केले पाहिजे. मात्र ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्ड आणि एमआयएमने नापसंती व्यक्त करीत सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचारार्थ याचिका दाखल करण्याचा इरादा व्यक्त केला आहे. हे अत्यंत दुर्दैवी आहे. जुने विषय संपवून पुढे जाण्याऐवजी, जुने विषय उरावर ठेवून पुन्हा मागे जाण्याची ही भूमिका नक्कीच देश आणि समाजहिताची नाही.

महत्त्वाचा मुद्दा हा पण आहे की, हिंदुत्ववादी यानंतर शांत होणार आहेत का? अजेंड्यावर काशी, मथुरा, यादीतील तीन हजार, तीस हजार वादग्रस्त ठिकाणांचा मुद्दा सोडणार आहेत का? आपल्याला कुठे तरी थांबता आले पाहिजे. हे नाही ठरवता आले तर आपली अधोगतीच होणार, विकासाचे मुद्दे बाजूला पडणार आणि धर्मनिरपेक्ष एकात्म समाजाला खिंडार पडतच राहणार.

मंदिर किंवा मशीद बांधण्यासाठी ज्या पक्षकारांनी संघर्ष केला, त्यांना ज्यांनी सहकार्य केले, उत्तेजन दिले त्यांनी धार्मिक स्थळे उभारावीत. महात्मा गांधींनी हाच सल्ला नेहरूंना दिला होता आणि नेहरूंनी तो पाळला होता.

# तक्रारींकडे पालिकेचे दुर्लक्ष

**जितेश अपार्टमेंट भाईदर पूर्वेला असलेली जितेश अपार्टमेंट ही इमारत मुख्य रस्त्यालाच लागून आहे. भाईदरमधील ही एक जुनी सोसायटी असली तरी या सोसायटीच्या अनेक समस्या आहेत. जितेश अपार्टमेंट सोसायटीसमोरील रस्त्यावर खड्डे, दरुगधी, वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण अशा मोठ्या समस्या असून याबाबत वारंवार तक्रार करूनही कार्यवाही होत नसल्याने रहिवासी त्रस्त झाले आहेत. तसेच या ठिकाणी महापालिकेकडून आजपर्यंत कुठल्याही प्रकारची रोगप्रतिबंधक फवारणी करण्यात न आल्यामुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

जितेश अपार्टमेंट या एकाच इमारतीत वेगवेगळे पाख (विंग) आहेत. सोसायटीतील रहिवाशांची संख्या अडीचशेच्या घरात आहे. सोसायटी बरीच वर्षे जुनी असल्याने इथल्या समस्यात भर पडत चालली आहे.

**इमारती बाहेर प्रचंड खड्डे**

जितेश अपार्टमेंट ही इमारत भाईंदर पूर्व परिसरातील मुख्य रस्त्यालगतच आहे. त्यामुळे सोसायटीत मोकळी जागा नसल्यामुळे इमारतीची सुरुवात मुख्य रस्त्यापासूनच होते. इमारती समोरच मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्ड्याचे साम्राज्य निर्माण झाले असल्यामुळे रहिवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असल्यामुळे अनेक वेळा गंभीर दुर्घटना घडत असल्याच्या येथील रहिवाशांच्या तक्रारी आहेत.

**कचराकुंडीची सुविधा असूनही अस्वच्छता**

महानगरपालिकेने या सोसायटीला कचऱ्याचे डबे दिले असले तरी वेळोवेळी ते उचलले जात नसल्याने नागरिकांना अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात हा कचरा भिजत असल्याने सोसायटीमध्ये दरुगधी पसरत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही आजवर त्यावर तोडगा निघालेला नाही.

वाहनतळाची असुविधा जितेश अपार्टमेंट सोसायटी परिसरात चारचाकी वाहने उभे करण्याची कुठलीच सोय उपलब्ध नाही. शिवाय सोसायटीबाहेरील रस्ता अरुंद असून



त्यावर वाहनांची सतत वर्दळ सुरू असते. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे इमारतीबाहेर वाहन उभे करण्यास जागाच शिल्लक राहात नाही. केवळ जागा नसल्याने रहिवाशांना वाहन घेणे शक्य होत नाही. शिवाय सततच्या वाहनांच्या वर्दळीमुळे रहिवाशांना ध्वनिप्रदूषणाचाही त्रास सहन करावा लागत आहे.

**परिसरात धुळीचे वातावरण**

जितेश अपार्टमेंट परिसरात विमल डेरी ते इंद्रलोक रस्त्यावर पदपथाचे काम करण्यात येत आहे. परंतु काम अतिशय संथगतीने होत असल्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून धुळीचे साम्राज्य पसरलेले आहे. या धुळीच्या त्रासाने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

# बंदूकधारकांची संख्या दुप्पट

## बेकायदा वापरामुळे पोलिसांची डोकेदुखी



परिमंडळ चारमध्ये मोडणाऱ्या अंबरनाथ, बदलापूर आणि उल्हासनगर शहरात बंदूकधारकांची संख्याही वाढली आहे. पाच वर्षांत परवाना असलेल्याबंदूकधारकांची संख्या २८९ वरून थेट ५८२ वर गेली आहे. त्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणूक काळातही अनेक बेकायदा बंदूक बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली होती.

वाढदिवसांच्या कार्यक्रमामध्ये बंदुकीतून हवेत गोळ्या झाडण्याचा प्रकार अंबरनाथ तालुक्यातील द्वारली गावात नुकताच समोर आला असून यामुळे अतिउत्साही शस्त्रधारकांमुळे पोलिसांचीही डोकेदुखी वाढली आहे. त्यामुळे अशा शस्त्रधारकांना रोखण्यासाठी पोलिसांनी हालचाली सुरू केल्या आहेत.

चौथी मुंबई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अंबरनाथ आणि बदलापूर शहरांचा चेहरामोहरा गेल्या काही वर्षांत बदलला आहे. या भागाचे झपाट्याने नागरीकरण होत आहे. त्याचसोबत येथे गुन्हेगारीचे प्रमाणही वाढले आहे. तसेच परिमंडळ चारमध्ये येणाऱ्या उल्हासनगर शहरातही गुन्हेगारीचा आलेख वाढताच आहे.

पोलीस दलात असलेले अपुरे मनुष्यबळ आणि वाढलेले गुन्हे यातही तफावत असल्याने गुन्हेउकल होण्याची संख्याही कमी आहे. त्यात अंबरनाथमधील द्वारली येथे वाढदिवसाच्या कार्यक्रमात झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर परवानाधारक बंदुकीच्या गैरवापराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सार्वजनिक कार्यक्रमात हवेत गोळ्या झाडणे हे प्रतिष्ठेचे मानले जात असल्याने वाढदिवस, हळदीच्या कार्यक्रमात असे प्रकार घडताना दिसतात. अंबरनाथमध्येच दोन वर्षांपूर्वी असा प्रकार समोर आला होता. त्यामुळे परवाना असलेल्या बंदूकधारकांवर नियंत्रण ठेवायचे कसे, असा मोठा प्रश्न पोलिसांसमोर उभा राहिला आहे.

# खंबाळपाडा परिसरात उग्र दर्पाने रहिवासी त्रस्त, वायुप्रदूषणाचा कहर



खंबाळपाडा परिसरात उग्र दर्पाने रहिवासी त्रस्त, वायुप्रदूषणाचा कहरडोंबिवली : औद्योगिक विभागातील फेज-१ पट्ट्यात आठ दिवसांपासून वायुप्रदूषणाचा नागरिकांना त्रास जाणवू लागला आहे. दोन दिवस दर्पाची तीव्रता अधिक वाढल्याने खंबाळपाडा परिसरात मळमळणे आणि उलट्यांचा त्रास स्थानिक रहिवाशांना सुरू झाला आहे. याबाबत सोमवारी रहिवासी एमआयडीसी आणि प्रदूषण कार्यालयात धाव घेणार आहेत.

औद्योगिक परिसरात अनेक रासायनिक कंपन्या असून त्यातून अधूनमधून तीव्र स्वरूपाचे वायुप्रदूषण होत असते. यात उघडे नाले आणि गटारांमधून कोणतीही प्रक्रिया न करता रासायनिक सांडपाणी सोडण्यात येत असल्याने याचा फटका स्थानिक रहिवाशांना बसतो. सध्या खंबाळपाडा भागात या प्रदूषणाची तीव्रता अधिक जाणवत आहे. रात्री हा दर्प ठाकुर्ली परिसरातील ९० फूट रोड परिसरापर्यंत पसरलेला असतो. या प्रदूषणाकडे गांभीर्याने का पाहत नाही, असा सवाल रहिवाशांचा आहे. खंबाळपाडा, भोईरवाडी परिसरात राहणारे काळू कोमास्कर यांनी अनेक दिवसांपासून हा त्रास सुरू असल्याचे सांगितले.

रात्री उशिरा येथील रासायनिक कंपन्या प्रचंड दुर्गंधीयुक्त जल व वायुप्रदूषण करत आहेत. फेज-१ मध्ये केमिकल झोन नसतानाही याठिकाणी केमिकल कंपन्या बेकायदेशीरपणे उभारल्या आहेत, याकडे कोमास्करांनी लक्ष वेधले आहे. शनिवार आणि रविवार एमआयडीसी आणि प्रदूषण नियंत्रण कार्यालयाला सुटी असल्याने सोमवारी आम्ही स्थानिक नागरिक संबंधित कार्यालयांना भेट देऊन अधिकाऱ्यांचे प्रदूषणाच्या समस्येकडे लक्ष वेधणार आहोत, अशी माहिती कोमास्कर यांनी दिली.

# ठाणे, वसई, पालघरमध्ये भात आणि फुलशेतीला फटका

## शेतकरी हवालदिल; संसार सावरण्यासाठी त्वरित नुकसानभरपाईची मागणी

**अवकाळी पावसाने ठाणे आणि पालघर जिल्ह्यांमध्ये शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. हाताशी आलेले भातपीक नष्ट झाल्याने शेतकऱ्यांना त्याचा मोठा फटका बसला. मात्र, पंचनामे करण्यास नुकतीच सुरुवात झाल्याने नुकसानभरपाई मिळणार कधी, हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.**

अवकाळी पावसामुळे ठाणे जिल्हातील एकूण ४२ हजार १९२ हेक्टर्स क्षेत्रातील भातपिकाचे नुकसान झाले आहे. यापैकी ३६ हजार २८६ हेक्टर जागेवर नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे पूर्ण झाले असून या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून २४ कोटी ६६ लाख इतकी रक्कम मिळावी असा अंदाज पंचनाम्याच्या अहवालामध्ये जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे, तर उर्वरित जागेवर नुकसान झालेल्या पिकांचे



पंचनामे करण्याचे काम सुरू आहे.

ठाणे जिल्ह्यात पावसाचे प्रमाण चांगले असल्याने मोठ्या प्रमाणात भातपिकाची लागवड केली जाते. जिल्ह्यातील ठाणे, कल्याण, मुरबाड, शहापूर, भिवंडी आणि अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण भागातील एकूण ५५ हजार २३५ हेक्टर जागेवर भातशेतीची लागवड करण्यात येते. जिल्ह्यात लागवड करण्यात येणाऱ्या गुजरात ११, वाडा कोलम आणि झिन्हीत या वाणांच्या तांदळाला मोठ्या प्रमाणात मागणी असते. मात्र, यंदा झालेल्या अवकाळी पावसात या भातशेतीचे मोठे प्रमाणात नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेले भातपीक नष्ट झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. जिल्ह्यात एकूण ४२ हजार १९२ हेक्टर एवढ्या जागेत भातशेतीचे नुकसान झाले असून त्यामध्ये ८१ हजार २४५ शेतकरी बाधित झाले आहेत.

**शेतीपूरक व्यवसायांवर परिणाम**

अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील सवा लाखांहून अधिक शेतकरी बाधित झाले असून, त्यापैकी जेमतेम २२ हजार शेतकऱ्यांकडे पीक विम्याचे कवच आहे. उर्वरित शेतकरी शासनाकडून मिळणाऱ्या मदतीवरच अवलंबून आहेत. रब्बी पिकाची लागवड लांबणीवर पडली आहे. शेतीसोबत बागायतदार, मच्छीमार, दुग्ध व्यवसाय, फलोत्पादन व शेतीपूरक व्यवसायांवर परिणाम झाला असून यावर आधारित हजारो कुटुंबांच्या जीवनसाखळ्यांवर परिणाम झाला आहे.

# हल्ल्यांच्या घटनांमुळे स्कायवॉकवर पोलिसांची गस्त वाढली

हल्ल्यांच्या घटनांमुळे स्कायवॉकवर पोलिसांची गस्त वाढलीडोंबिवली : स्कायवॉकवरून उतरत असताना शिवीगाळ केल्याचा जाब विचारणाऱ्या दोघांसह त्यांना वाचविण्यासाठी गेलेल्या त्याच्या मित्रावर चाकूने हल्ला केल्याची घटना बुधवारी मध्यरात्री घडली आहे. तसेच २२ मार्चला सायंकाळी केडीएमसीचे डोंबिवलीतील बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुभाष पाटील यांच्यावर चार हल्लेखोरांनी शस्त्राने हल्ला चढविला होता. वाढत्या हल्ल्यांच्या घटना विचारात घेऊन आता पोलिसांनी तेथे रात्रीच्या सुमारास गस्त ठेवण्याचा निणऱ्य घेतला आहे. स्कायवॉकवर बुधवारी झालेल्या हल्ल्याप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.या घटनेमुळे पुन्हा रामनगर पोलिसांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत.

ठाण्यात राहणारे पाटील हे सायंकाळी कार्यालयातून घरी जात असताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. ते महापालिकेच्या विभागीय कार्यालयातून निघाल्यावर स्कायवॉकने डोंबिवली स्थानकाकडे जात होते. त्यावेळी पाटकर रोडवरील स्कायवॉकवर दबा धरून बसलेल्या चौघांनी त्यांच्यावर पेनसारख्या तीक्ष्ण हत्याराने वार केले. यामध्ये पाटील यांच्या पोटावर, छातीवर, पाच ते सहा वार झाले होते. पाटील यांना तत्काळ रुग्णालयात दाखल केले गेल्याने त्यांचे प्राण वाचले.



# अयोध्येतील ५ एकर जागेवर हॉस्पिटल उभारावं: जावेद अख्तर

**मुंबई-** 'अयोध्येत ज्यांना पाच एकर जमीन मिळेल त्यांनी त्या जागेवर एक मोठे चॅरिटेबल हॉस्पिटल बनविण्याचा निर्णय घ्यावा. हे हॉस्पिटल उभारण्यासाठी सर्व धर्माच्या लोकांनी मदत करावी' असं मत सुप्रसिद्ध गीतकार आणि पटकथा लेखक जावेद अख्तर यांनी व्यक्त केलं आहे.

अयोध्येतील राममंदिर-बाबरी मशीद वादावर सुप्रीम कोर्टाने शनिवारी ऐतिहासिक निकाल दिला. अयोध्येतील वादग्रस्त जागा ही हिंदूंची असल्याचा निर्वाळा न्यायालयानं दिला. तसंच, मुस्लिम पक्षकारांना अयोध्येतच पाच एकर जमीन देण्याचे आदेशही सरकारला दिले. देशभरात या निकालावर समाधान व्यक्त होत आहे. या निर्णयानंतर बॉलिवूडच्या सेलिब्रिटींनी याबद्दल प्रतिक्रिया दिल्या. जावेद अख्तर यांनी आपलं मत व्यक्त करण्यापूर्वी या निकालाबाबत सुप्रसिद्ध पटकथा लेखक सलीम खान यांनीही आपलं मत व्यक्त केलं होतं. 'अयोध्येचा वाद आता संपला आहे. मुस्लिम समाजानं सगळं काही विसरून पुढं जायला हवं. भारतातील मुस्लिमांना मशिदीपेक्षा शाळेची जास्त गरज आहे. त्यामुळंच अयोध्येत मिळणाऱ्या पाच एकर जमिनीवर शाळा उभारली जावी,' असं मत त्यांनी मांडलं. 'न्यायालयाचा निर्णय स्वागतार्ह आहे. खूप जुना विषय आता संपला आहे. या मुद्द्यावर अधिक चर्चा करण्याची गरज नाही. मुस्लिमांनी आता



आपल्या मूलभूत समस्यांवर लक्ष केंद्रीत करून त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. नमाज तर रेल्वे आणि विमानातही पठण केलं जाऊ शकतं. पण खरी गरज शाळा आणि रुग्णालयांची आहे. त्यामुळं अयोध्येत मिळणाऱ्या जमिनीवर शाळा किंवा महाविद्यालय झाल्यास खूप चांगली गोष्ट होईल. २२ कोटी मुस्लिमांना चांगलं शिक्षण मिळाल्यास आपल्या देशातील अनेक उणीवा दूर होतील,' असंही सलीम खान म्हणाले.

# 'भुयारी गटार'च्या कामाला मार्चपर्यंत 'अल्टिमेटम'

**अकोला-** 'अमृत' योजनेंतर्गत मंजूर भूमिगत गटार योजनेची दोन वर्षांची मुदत ऑक्टोबर महिन्यात संपुष्टात आली आहे. ही बाब लक्षात घेता नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर यांनी येत्या मार्च महिन्यापर्यंत सदर योजनेचे काम कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करण्याचा 'अल्टिमेटम' कंत्राटदारासह महापालिकेला दिल्याची माहिती आहे. सद्यस्थितीत भूमिगतचे ७० टक्के काम पूर्ण झाले असले तरी, कामाच्या दर्जावर खुद्द मनपा प्रशासनही संभ्रमात असल्याची माहिती आहे. शहरातील घाण सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करून त्याचा वापर शेती किंवा उद्योगासाठी करता येईल, अशा दुहेरी भूमिगत गटार योजनेच्या कामाला २०१७ मध्ये सुरुवात झाली होती. शासनाने भूमिगत गटार योजनेंतर्गत ३० आणि सात एमएलडी असे दोन प्लांट उभारण्यासाठी ७९ कोटी २३ लाख रुपये मंजूर केले. मनपा प्रशासनाने ६१ कोटी २४ लाख रुपये किमतीच्या कामाची निविदा प्रकाशित केली असता, ईगल इन्फ्रा इंडिया लिमिटेड कंपनी ठाणे यांच्यावतीने ८.९१ टक्के जादा दराची निविदा प्राप्त झाली होती. शिलोडा परिसरातील ६ एकर जागेवर एसटीपीचे बांधकाम पूर्ण झाले असून, पीडीकेव्ही परिसरात एसटीपीचे बांधकाम निर्माणाधीन आहे. करारनाम्यातील निकषानुसार कंपनीने सिमेंट, लोखंड, स्टील, रेती आदी साहित्याचा दर्जा राखणे अपेक्षित होते. कंपनीने शिलोडा येथील एसटीपीसाठी वापर केलेल्या साहित्याची अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने तपासणी केली असता,



साहित्याचा दर्जा योग्यरीत्या वापरण्यात आला नसल्याचा अहवाल प्राप्त झाला होता. त्यावरून बरेच वादंग उठले होते. 'भूमिगत' गटार योजनेचे काम सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात आहे. केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून कोट्यवधींची विकास कामे होत असताना त्यावर तांत्रिक लेखापरीक्षणाच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यासाठी केंद्र शासनाने शाह कन्सलटन्सीची नियुक्ती केली. दुसरीकडे शिलोडा येथील एसटीपीचे बांधकाम होत असताना तेथील साहित्याची अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने तपासणी केली होती. त्यामुळे अधिकृत 'थर्ड पार्टी' कोणती, असा सवाल उपस्थित होतो.

# भारतीय अर्थव्यवस्था आव्हानांना तोंड देतेय - निर्मला सीतारमण

**नवी दिल्ली-** भारत सध्या आर्थिक आव्हानांना तोंड देत आहे, असं भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या. व्ही. अनंता नागेश्वरन आणि गुलजार नटराजन यांच्या अर्थविषयक पुस्तकाच्या प्रकाशनावेळी अर्थमंत्री सीताारामण यांनी भारतीय अर्थव्यवस्थे संदर्भात उपस्थितांशी संवाद साधला. 'हे पुस्तक लोकप्रिय होईलच, मात्र धोरणात्मक निर्णयांसाठी उपयुक्त ठरेल. दुसरं म्हणजे, पुस्तकाच्या प्रकाशनाची वेळही अत्यंत महत्त्वाची आहे. आपण सध्या आर्थिक आव्हानांना तोंड देतोय,' असं सीतारमण म्हणाल्या.



भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ गेल्या सहा वर्षातली सर्वांत कमी म्हणून नोंदवली गेलीय. पहिली तिमाहीत ही वाढ ५ टक्क्यांवर आली आहे.

# बालकामगार ठेवल्यास थेट गुन्हा दाखल

**नंदुरबार-** बालकामगार प्रथा निर्मूलनासाठी समाजातील प्रत्येक घटकांचा सहभाग आवश्यक असून जिल्ह्यातील धोकेदायक उद्योगांच्या ठिकाणी बाल कामगार आढळून आल्यास त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भारुड यांनी दिले.

जिल्ह्यात ७ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर या कालावधीमध्ये बाल कामगार प्रथेविरुध्द जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी सरकारी कामगार अधिकारी किशोर जोशी, पोलीस उप अधीक्षक सिताराम गायकवाड, महिला व बाल



कल्याण विभागाचे जाधव, दुकान निरिक्षक रमेश शेळके, स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

जनजागृती मोहिम कालावधीत जिल्हा कार्यक्षेत्रातील बाल कामगार बहुलक्षेत्र निश्चित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील विटभट्टी मालकांकडून बालकामगार न ठेवण्याबाबत हमीपत्र लिहून घेतले जाईल. हॉटेल असोसिएशन, व्यापारी संघटना यांच्या बैठका, चर्चासत्रे आयोजित करुन बाल कामगार अधिनियमाबाबत माहिती देण्यात येईल. मुख्य बाजारपेठ, मोठी गावे, नगरपालिका क्षेत्र याठिकाणी रॅलीचे आयोजन करणे, सार्वजनिक ठिकाणी स्वाक्षरी मोहिम राबविणे, स्टीकर प्रदर्शित करणे, सर्व विभागात सामुहिक शपथ घेणे, स्वयंसेवी संस्था, अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांच्या सहकार्याने अत्यअल्प उत्पन्न असलेल्या क्षेत्रामधील पालकांचे प्रबोधन करण्याचा उपक्रम देखील राबविण्यात येणार आहे. स्थानिक बोलीभाषेतून बालमजुरीच्या अनिष्ठ प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी प्रबोधन करण्यासह विविध उपक्रम राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. भारुड यांनी दिले.

# हैद्राबादमध्ये लोकल आणि एक्स्प्रेसची समोरासमोर जोरदार धडक



**काच्चीगुडा-** हैद्राबादमध्ये काच्चीगुडा स्थानकात लोकल आणि एक्स्प्रेसची समोरासमोर धडक झाल्यामुळे मोठी दुर्घटना. सिग्नलमध्ये बिघाड झाल्यामुळे समोरून येणाऱ्या ट्रेनला कोणताही संदेश मिळाला नाही त्यामुळे ही दुर्घटना घडली. सकाळी ११.४५ मिनिटांनी हा अपघात घडला. ही धडक इतकी भीषण होती की लोकलच्या समोरच्या डब्याचं मोठं नुकसान झालं.

या दुर्घटनेमध्ये १० जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. जीवितहानी झाल्याची अद्याप कोणतीही माहिती समोर आली नाही.

एकाच ट्रॅकवरून दोन्ही ट्रेन कशा चालवल्या जात होत्या? सिग्नलमधील बिघाडाची कल्पना देण्यात आली नव्हती का? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

य़ा प्रकरणी योग्य ती चौकशी करून रेल्वेतील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. काच्चीगुडा स्थानकात लोकल आणि एक्स्प्रेसची समोरासमोर धडक. भीषण अपघाताचे फोटो समोर. ही धडक इतकी भीषण होती की लोकलच्या समोरच्या डब्याचं मोठं नुकसान झालं. डब्यात अडकलेल्या प्रवाशांची सुखरूप सुटका करण्यात यश. या दुर्घटनेमध्ये १० जण गंभीर जखमी तर ५ जण किरकोळ जखमी झाले आहेत. त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात सध्या उपचार सुरू आहेत.

# शिवसेनेचा देशातील मुस्लिमांना सल्ला, राहुल गांधींचा दाखला देत ओवेसींना फटकारले

**मुंबई- ऐतिहासिक अयोध्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने शनिवारी निकाल दिला. रामलल्ला न्यासाच्या बाजूने निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने वादग्रस्त जागेवर शिया वक्फ बोर्डाचा हक्क नसल्याचं नमूद केलं. तसेच मुस्लिमांना पर्यायी ५ एकर जमीन देण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. यावर मुस्लीम पक्षकारांनी नाराजी व्यक्त केली. तर काहींनी या निर्णयाचे स्वागतही केलं.**

दरम्यान, शिवसेनेचे मुखपत्र सामनाच्या अग्रलेखातून देशातील मुस्लिमांना एक सल्ला देण्यात आला आहे. अयोध्येत देण्यात येणाऱ्या ५ एकर जमिनीवर मशिद बांधण्यात



येणार आहे. त्या मशिदीला बाबरचे नाव न देता एखाद्या मुस्लीम संताचे किंवा नेत्याचं नाव द्यावं असा सल्ला अग्रलेखातून देण्यात आला आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अयोध्या प्रकरणाच्या निकालानंतर दिलेल्या प्रतिक्रियेचं कौतुकही करण्यात आलं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राहुल गांधी यांनी अत्यंत नम्रपणे या निर्णयाचं स्वागत केलं. अयोध्या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निकालाचा आदर करू असं राहुल गांधी यांनी म्हटलं. त्यांची ही प्रतिक्रिया समंजसपणा असल्याचंही अग्रलेखात म्हटलं आहे.

अयोध्या निकालावर एमआयआम नेते ओवेसी यांनी पाच एकर जमिनीची खैरात नको अशी प्रतिक्रिया दिली होती. त्याचा समाचार अग्रलेखातून घेतला आहे. राहुल गांधींसारखा समंजसपणा ओवेसीसारख्या नेत्यांनी दाखवायला हवा होता असं म्हटलं आहे. खरंतर देशावर आक्रमण करणाऱ्या बाबराच्या नावाने पाच एकर जमिनीची खैरात देण्याची दिलदारी फक्त हिंदुस्थानच दाखवू शकतो असंही अग्रलेखात म्हटलं आहे. ओवेसींनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर असमाधानी असल्याचं म्हणताना सांगितलं होतं की, हा निकाल म्हणजे सत्यावर आस्थेचा विजय आहे. तसेच वादग्रस्त जागा रामलल्ला न्यासाला देऊन मुस्लिमांना पर्यायी जागा देऊ केली. आम्हाला खैरात नको. खरंतर आमची लढाई पर्यायी जागेसाठी कधीच नव्हती असंही ओवेसी म्हणाले होते. वादग्रस्त जागेच्या निकालात महत्वाच्या ठरलेल्या पुरातत्व खात्याच्या अहवालाचेही महत्त्व अग्रलेखात नमूद करण्यात आलं आहे. मंदिर पाडून त्याच्या जागी मशिदीची उभारणी केल्याचा पुरावा त्यांना देता आला नसला तरी मशीद रिकाम्या जागी बांधली नव्हती आणि त्याआधी गैर इस्लामिक बांधकाम असल्याचं न्यायालयानं मान्य केलं.

# इराणमध्ये सापडले नवीन तेलसाठे, ५३ अब्ज बॅरल पुरवठ्याची क्षमता

**इराण-** इराणमध्ये तेलाच्या नवीन साठ्याचा शोध लागला आहे. या तेलसाठ्यामुळं इराणच्या सध्याच्या तेलसाठ्यामध्ये जवळपास तीन पटीनं वाढ होईल, अशी माहिती इराणचे राष्ट्रपती हसन रुहानी यांनी दिली आहे.

हा तेलसाठा खुझेस्तान प्रांताच्या नैऋत्य भागात असून तब्बल २,४०० स्क्वेअर किलोमीटरच्या परिसरात पसरला आहे. इथून साधारणतः कच्च्या तेलाचे ५३ अब्ज बॅरल इतका पुरवठा होऊ शकतो. अमेरिकनं लादलेल्या निर्बंधांमुळे इराणला सध्या अन्य देशांना तेलविक्री करण्यात अडचणी येत आहेत. 'आम्हाला या ठिकाणी ५३ अब्ज बॅरल कच्चं तेल निघेल असा साठा आढळून आला आहे. हा अत्यंत मोठा असा तेलसाठा



आहे. तेलाच्या या थराची खोली ८० मीटर इतकी आहे,' यझाद या शहरात बोलताना हसन रुहानींनी म्हटलं. तेल उत्खननाचा वेग जर १ टक्क्यानं वाढला तर इराणचा तेलामधून मिळणारा महसूल ३२ अब्ज डॉलर्सनं वाढेल, असंही रुहानींनी सांगितलं. 'मला व्हाईट हाऊसला सांगायचं आहे, की तुम्ही इराणच्या तेलविक्रीवर निर्बंध लादले. मात्र या देशातील इंजीनिअर्स आणि अन्य कर्मचाऱ्यांनी ५३ अब्ज बॅरल्स इतका तेलसाठा शोधण्यात यश मिळवलं आहे,' निम-सरकारी फार्स न्यूज एजन्सीनं रुहानी यांचं हे वक्तव्य प्रसिद्ध केलं आहे. हा नवीन तेलसाठा इराणमधील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत मोठा साठा असल्याचं AP या वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. ऐहवाज हा इराणमधील सर्वांत मोठा साठा असून याची क्षमता ६५ अब्ज डॉलर इतकी आहे. इराण जगातील सर्वांत मोठ्या तेलउत्पादक देशांपैकी एक आहे. दरवर्षी इराणकडून अब्जावधी डॉलर्सच्या तेलाची विक्री होते. इराणमधील सध्याच्या तेलसाठ्यांची क्षमता ही १५० अब्ज बॅरल्स इतकी असल्याचंही रुहानी यांनी सांगितलं.

# नवी मुंबईतील कोट्यवधींचे प्रकल्प धूळ खात!

**नवी मुंबई-** नवी मुंबई महापालिकेने शहरातील नागरिकांसाठी विविध सोयी-सुविधा व कोट्यवधी रुपये खर्चाच्या प्रकल्पांची निर्मिती केली; मात्र उद्घाटनाविना वापर होत नसल्यामुळे अनेक प्रकल्प धूळ खात पडून आहेत. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चाच्या या प्रकल्पांची उभारणी कशासाठी, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे अनेक तयार प्रकल्पांचे उद्घाटन रखडले होते; मात्र आता आचारसंहिता संपल्यानंतरही हे प्रकल्प



उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे नवी मुंबईकरांकडून याबाबत संताप व्यक्त केला जात आहे. नवी मुंबई महापालिकेमार्फत तयार करण्यात आलेले अनेक प्रकल्प विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे उद्घाटनाविना पडून आहेत. घणसोलीतील सेंट्रल पार्कमागील एक वर्षापासून बांधून पूर्ण असतानादेखील वापर नसल्याने त्या ठिकाणी देखभाल-दुरुस्तीचे कंत्राट आणण्याची वेळ पालिकेवर आली आहे. पंचमहातत्त्वावर आधारित या सेंट्रल पार्कसाठी पालिकेने जवळजवळ १५ कोटींपेक्षा अधिकचा खर्च केला. या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून, नुकताच त्याच्या तिकीटदराबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला, परंतु तरीदखील हे महत्त्वपूर्ण पार्क उद्घाटनाविना वापरात नाही. तसेच ऐरोली सेक्टर १७ येथील अभ्यासिकेची इमारत वापरात नाही, त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे जागेअभावी तसेच अभ्यासासाठी आवश्यक वातावरण नसल्यामुळे नुकसान होत आहे. सानपाडा येथील अण्णाभाऊ साठे समाजमंदिर पूर्ण होऊन तीन वर्षे झाली, पण तिचाही पूर्णत्वाने वापर नाही. सानपाडा येथेच आकर्षक व देखणे असे सेन्सरी उद्यान बनवण्यात आले आहे.

# भारताचा बांगलादेशवर मालिका विजय

**कोलकाता-** बांग्लादेशविरूद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात विजय मिळवून भारतानं मालिकाही जिंकली आहे. भारतानं २-१ असा या टी-२० मालिकेवर विजय मिळवला आहे. श्रेयस अय्यर आणि के एल




राहुल यांची अर्धशतकं यामुळं भारतानं बांगलादेशपुढे १७५ धावांचं आव्हान ठेवलं होतं. तर भारतीय गोलंदाज दीपक चहरची हॅटट्रिक साधली. चहरनं ७ धावा देत ६ विकेट्स घेतल्या. 'सामनावीर' म्हणूनही चहरला गौरवण्यात आलं. भारतानं दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशची दमछाक झाली. नईम आणि मिथून यांची भागीदारी सुरू असतानाच मिथून २७ धावांवर बाद झाला. त्यानंतर नईमही ८१ धावांवर परतला. त्यामुळं बांगलादेशचा डाव १४४ धावांवरच आटोपला.

JET TECHNO SERVICES PVT LTD.
Email :jettechnoservices@gmail.com

Senior Citizen Social Rights Foundation
सिनिअर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशन
Email : scsocialrightsfoundation@gmail.com • NITY AAYOG UNIQUE ID : MH2019/0224064

R.N.I.no. MAHAR/2014/57121
मानवाधिकार बातमी
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

Annapurna Caterers
Udyog Aadhaar Number : MH33A0133630

R.N.I.no.MAHAR/2014/55402
महानगर समाचार
आपले स्वातंत्र आपले विचार
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

अखिल भारतीय मानवाधिकार युनियन
संस्थापक
दिपक मोरेश्वर नाईक
9594418181 / 9594047474

SOCIAL RIGHTS FOUNDATION
(सोशल राईटस् फाऊंडेशन)
महा /२०७०/१५ ठाणे संस्था नोंदणी अधिनियम १८६० द्वारा नोंदणी

R.N.I. No. MAHMAR/2014/60133
पोलिस बातमी पत्र

आश्रय ट्रस्ट
सामाजिक • शैक्षणिक • सांस्कृतिक

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)